# ...तर १ एप्रिलपासून दुप्पट टोल भरावा लागणार

## महाराष्ट्र सरकारचा मोठा निर्णय

**मुंबई–** राज्य सरकारने फास्ट टॅग संदर्भात मोठा निर्णय घेतला आहे. येत्या १ एप्रिलपासून प्रत्येक टोल नाक्यावर फास्ट टॅग लावणे अनिवार्य असणार आहे. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने हा निर्णय घेतला आहे. त्यामुळे आता तुमच्या कारला फास्ट टॅग लावणे बंधनकारक असणार आहे. जर तुम्ही रोख, कार्ड किंवा यूपीआयद्वारे टोल भरला तर तुम्हाला टोलचे पैसे डबल भरावे लागतील, असा निर्णय घेण्यात आला आहे.

टोलची प्रक्रिया अधिक कार्यक्षम करण्यासाठी आणि टोलवरील लागणारा वेळ आणि फास्ट टॅगचा गोंधळ टाळण्यासाठी प्रत्येक वाहनांना फास्ट टॅग लावणे आता अनिवार्य करण्यात आले आहे. फास्ट टॅग सक्तीच्या निर्णयाला आव्हान देणारी जनहित याचिका उच्च न्यायालयाने गुरूवारी फेटाळली आहे. त्यानंतर आता १ एप्रिलपासून राज्यातील सर्व टोल प्लाझावर फास्टॅग अनिवार्य करण्यात येणार आहे. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने हा निर्णय घेतला आहे. फास्ट टॅग न वापरणाऱ्या वाहनधारकांना दुप्पट रोख रक्कम द्यावी लागणार आहे. हा निर्णय भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने (एनएचएआय) निश्चित केलेल्या धोरणांशी आणि रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाच्या निर्देशाशी सुसंगत असल्याचं स्पष्ट करण्यात आलं आहे. मुंबईतील पाच टोलनाके एमएसआरडीसीकडे आहेत. यात मुलुंड पश्चिम, मुलुंड पूर्व, ऐरोली, दहिसर आणि वाशी या पाच टोल नाक्यांवर स्कूल बसेस, हलकी मोटार वाहने आणि राज्य परिवहन बस यांना कोणताही टोल आकारला जात नाही. तर, मुंबई-पुणे एक्सप्रेस वे, जुना मुंबई-पुणे महामार्ग, मुंबई-नागपूर समृद्धी महामार्ग, वांद्रे-वरळी सी लिंक, सोलापूर एकात्मिक रस्ते विकास प्रकल्प, नागपूर एकात्मिक रस्ते विकास प्रकल्प, छत्रपती संभाजी नगर एकात्मिक रस्ते विकास प्रकल्प, काटोल बायपास आणि चिमूर-वरोर-वणी महामार्गचं व्यवस्थापनही एमएसआरडीसीकडे आहे. या मार्गांवरून प्रवास करणाऱ्या प्रवाशांना फास्ट टॅग बंधनकारक असेल. अन्यथा वाहनधारकांना दुप्पट पैसे द्यावे लागतील. मुंबईत हलक्या वाहनांना, शाळेच्या बसला टोलमाफी आहे. त्यानुसार मुंबईच्या प्रवेशद्वारावरील पाचही टोल नाक्यांवर या वाहनांसाठी स्वतंत्र मार्गिका असून तेथे फास्ट टॅग प्रणाली कार्यान्वित करण्यात आलेली नाही. त्यामुळे मुंबई, एमएमआरमध्ये प्रवास करणाऱ्या वाहनांपैकी अनेक वाहनांना फास्ट टॅग नसण्याची शक्यता आहे. पण यापुढे त्यांनाही फास्ट टॅग प्रणालीशी खाते जोडावे लागेल. कारण वांद्रे-वरळी सागरी सेतू आणि अटल सेतूवर टोल वसुली करण्यात येते. तेथे कोणत्याही वाहनांना टोल माफी नाही. त्यामुळे तेथे प्रवास करणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना फास्टॅग अनिवार्य आहे.

# वैजापूर नगरपालिकेचा गलथान कारभार

## स्वच्छतेच्या नावाने बोंबाबोंब

**वैजापूर (प्रतिनिधी)–** येथील नगरपालिकेच्या कारभाराची लक्तरे वेशीवर टांगली असताना याकडे पुढाऱ्यांना लक्ष द्यायला वेळ आहे ना वरिष्ठ अधिकाऱ्यांना. समस्या घेऊन आलेल्या अभ्यागतांच्या समस्या ऐकून न घेताच शब्दबंबाळ करून पिटाळून लावले जाते. कार्यालयप्रमुखांसह बहुतांश कर्मचारी दुसऱ्या ठिकाणी राहून मउंटावरून शेळ्या राखण्यासारखा पालिकेचा कारभार पाहतात. एकंदरीतच पालिकेत सध्या महम करे सो कायदा सुरू असून नोकरीला आले अन् पालिकेचे मालक झाले. अशी अवस्था झाली आहे.

साधारणतः दोन वर्षांपूर्वी पालिका सदस्यांचा कार्यकाळ संपुष्टात आल्यानंतर तत्कालीन मुख्याधिकारी भागवत बिघोत यांच्याकडे प्रशासक पदाची सूत्रे हाती आली. परंतु सहा महिन्यांपूर्वी त्यांची बदली झाली. अन् कारभार दुसऱ्या अधिकाऱ्याचा हाती गेला. तेव्हापासून शहराला अवकळा लागली आहे. खुल्या गटारींसह भूमिगत गटारी ओसंडून वाहू लागल्या आहेत. स्वच्छतेच्या नावाने बोंबाबोंब सुरू झाली आहे. अशुद्ध पाणीपुरवठा, शहराच्या चोहोबाजूंनी साचलेले कचऱ्यांचे ढीग, शहरात डासांनी मांडलेला उच्छाद, अधिकाऱ्यांची मनमानी हे आता कायमचेच झाले आहे. बाहेरून शहरात येणाऱ्यांचे स्वागत कचऱ्यांच्या ढीगाने होते. यापेक्षा बकाल अवस्था शहराची काय असू शकते? कार्यालयप्रमुख येवल्यातून अपडाऊन करतात. दुपारी १२.३० वाजता कार्यालयात यायचं. दोन वाजेपर्यंत थांबायचे अन् पुन्हा पाच वाजता पालिकेत आराम करून यायचे. तोपर्यंत समस्या घेऊन आलेल्या अभ्यागतांची कंटाळून - कंटाळून वाट लागलेली असते. अभ्यागतांना अधिकाऱ्याची एवढी प्रतीक्षा करावी लागत असेल तर ते कशाला थांबतील. प्रतीक्षा करूनही त्यांची समस्या तर सुटत तर नाहीच. त्याबदल्यात त्यांना अधिकाऱ्यांकडून तुसटपणाची वागणूक मिळून शब्दबंबाळ होण्याची वेळ येते. अभ्यागतांची भेट घेणे हे अगोदर अधिकाऱ्यांचे कर्तव्य आहे. समस्या, प्रश्न जाणून घेणे हा नंतरचा भाग आहे. परंतु अभ्यागतांना पहिला प्रश्न पडतो की, भेटायचे कुणाला व कुठे? कारण अधिकारी ठिकाणावर नसतात. कार्यालय प्रमुखांप्रमाणेच त्यांच्या खालोखाल असणारे उपमुख्याधिकारीही छत्रपती संभाजीनगर येथे राहून कारभार पाहतात. त्यांच्याही असंख्य तक्रारी आहेत. कार्यालयप्रमुखांसह अन्य अधिकारीही आठवड्यातून कधीतरी हजेरी लावतात. त्यातही त्यांचा डामडौल, मग्रुरी, आडदांडपणा पाहता विचारता सोय नाही. शासनाकडून गलेलठ्ठ पगार घ्यायचा अन् कामे न करता अभ्यागतांना मसुनावूनफ घ्यायचे. असंच सध्या सुरू आहे. पालिकेत सध्या समस्यांना प्राधान्य तर नाहीच. परंतु अभ्यागतांना मोठ्या युक्तिवादाला सामोरे जावे लागते. न्यायालयात एखाद्या खटल्यावर जेवढा युक्तिवाद होत नसेल तेवढा येथे होतो. अधिकारी समस्या सोडवण्याऐवजी प्रश्नांमध्ये गुरफटून अभ्यागतांना पिटाळून लावतात. त्यामुळे येणारा हेही विसरून जातो की, आपण कशासाठी आलो होतो? अधिकारी पालिकेचे मालक नव्हें तर जनतेचे नोकर असतात. याचे धडेही आता पालिकेतील अधिकाऱ्यांना देणे गरजेचे आहे. त्यामुळे पालिकेच्या कारभाराबाबत सध्या जिकडे-तिकडे चोहीकडे आनंदी- आनंद गडे असेच म्हणता येईल.

- पालिकेतर्गंत काम करणाऱ्या ठेकेदारांची अवस्था म्हणजे अवघड दुखणं अन् डॉक्टर जावई अशी झाली आहे. अधिकाऱ्यांनी अचानक टक्केवारी वाढविल्याने हे दुखणं सांगायचे कुणाला? असा प्रश्न त्यांना पडला आहे. त्यामुळे ठेकेदार आता काढता पाय घेऊ लागले आहे. काम नाही मिळाले तरी चालेल पण अधिकाऱ्यांचे घर भरायचे नाही. असा पवित्रा त्यांनी घेतला आहे. सध्या शहरात ठेकेदारांच्या मुस्कटदाबीची खुलेआमपणे चर्चा सुरू आहे. कोण किती टक्केवारी मागतो. हे आता झाकून राहिले नाही. एकंदरित नोकरदारच पालिका लुटून खायला निघाले असल्याचे समोर येत आहे.

- वैजापूर पालिकेवर गलथान कारभाराचा ठपका ठेवून जिल्हाधिकाऱ्यांनी आडदांड अधिकाऱ्याला नोटीस बजावली खरी! परंतु केवळ नोटीस देऊन हा गलथान कारभार थांबणार नाही.त्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांनी न.प. कार्यालयाची झाडाझडती घेऊन तेथे काय चालू आहे. याची शहानिशा केली पाहिजे. त्यानंतरच अधिकाऱ्यांच्या प्रतापाचा भांडाफोड होईल.

# महिला दिनानिमित्त अंबिका महिला पतसंस्थेत सभासद महिलांसाठी शिबीर



**श्रीरामपूर (प्रतिनिधी)–** येथील अंबिका महिला नागरी सहकारी पतसंस्था, ईनरव्हिल क्लब व हाल लॅब (हिंद लॅब) याच्या संयुक्त विद्यमाने महिलांसाठी आरोग्य तपासणी शिबीर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरात अनेक महिलांची तपासणी करण्यात आली.

यामध्ये प्रामुख्याने कॅल्शियम, रक्त व युरीन आदी तपासणी करण्यात आल्या. या शिबिरामध्ये एकूण ८३ सभासद महिलांची तपासणी मोफत करण्यात आली. अध्यक्षस्थानी ईनरव्हिल क्लबच्या अध्यक्षा डॉ. शितल घोगरे होत्या, तर प्रमुख पाहुणे म्हणून सेवानिवृत्त जिल्हा वैद्यकीय अधिकारी डॉ. वसंतराव जमधडे, डॉ. मयुर कापसे, डॉ.वैशाली कापसे, डॉ. सुरेखा जोशी हे उपस्थित होते.मान्यवरांचा सत्कार अंबिका संस्थेच्यावतीने शाल व आंब्याचे रोपटे देऊन करण्यात आला. कार्यक्रमाची संकल्पना अंबिका पतसंस्थेचे जनसंपर्क अधिकारी राजाराम काकडे यांनी विशद केले. महिलांनी आपल्या आरोग्याकडे व आहाराकडे विशेष लक्ष देण्याची गरज असून वयाच्या चाळीशीनंतर आरोग्याच्या दृष्टिकोनातून अशा प्रकारच्या नियमित तपासण्या करणे अत्यंत आवश्यक आहे. कारण महिलांवर संपूर्ण कुटुंबाची जबाबदारी असते. त्यादृष्टीने महिलांनी आपल्या आरोग्यावर लक्ष ठेवून आपले कुटुंब निरोगी ठेवण्याचा प्रयत्न करावा. अंबिका महिला पतसंस्थेने आपल्या सभासदांसाठी राबविलेला सदरचा उपक्रम स्तुत्य स्वरुपाचा असून संस्था आर्थिक व्यवहाराबरोबर आपल्या सभासदांच्या आरोग्याची काळजी घेत असल्याचे प्रतिपादन डॉ. जमधडे यांनी केले तर डॉ. मयुर कापसे, डॉ. शितल घोगरे, डॉ. सुरेखा जोशी यांनी मनोगत व्यक्त केले. रक्त व युरीन तपासणीसाठी हिंद लॅब तर्फे अनिल कुदळे व त्यांचे सहकारी याचे सहकार्य लाभले. यासाठी प्रसन्न धुमाळ यांनी मोलाचे सहकार्य केले. अंबिका संस्थेच्या शाखाप्रमुख उषा माळी यांनी सर्वांचे आभार मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रसन्न धुमाळ यांनी केले. याप्रसंगी संस्थेच्या संस्थापक चेअरमन सुशीलाताई नवले, विद्यमान चेअरमन राधिकाताई पवार, संचालक सुनीता ढगे, आशा बंगाळ, पुर्वा वखरे, के. डी. देशमुख, मनीषा ढोकचौळे, संगीता देवकर, वडाळा ग्रामपंचायतचे माजी सरपंच कृष्णा पवार, सुरेश देवकर, सुहास बंगाळ, अंबिका संस्थेचे व्यवस्थापक अण्णासाहेब जाधव आदींसह सर्व सेवकवर्ग व दैनिक ठेव प्रतिनिधी उपस्थित होते.

# देहऱ्यामधील बेपत्ता विवाहीत अकोल्यात सापडली

## लव जिहादच्या चर्चेने वातावरण तापले; ग्रामस्थांकडून आंदोलन

**अहिल्यानगर (प्रतिनिधी)–** देहरे (ता. नगर) येथील ३० वर्षीय विवाहित महिला बेपत्ता झाली. त्या महिलेस लव जिहादच्या माध्यमातून फूस लावून पळविल्याची चर्चा गावात सर्वत्र सुरू झाली. रविवारी दिवसभर गावातील वातावरण संतप्त होत आंदोलन करण्यात आले. सायंकाळी आ. संग्राम जगताप यांनी गावात भेट दिली. दरम्यान पीडित महिला अकोले येथे सापडली असून एमआयडीसी पोलिसांनी तिला ताब्यात घेतले.

देहरे गावामधून एक विवाहित महिला शुक्रवारी संध्याकाळी मुलासाठी जत्रेमधून खेळणी विकत आणते, असे सांगत घरातून बाहेर पडली आणि गायब झाली. रात्री उशिरापर्यंत महिला न आल्याने तिचा शोध सुरू करण्यात आला व एमआयडीसी पोलीस ठाण्यात तशी तक्रार देण्यात आली. या महिलेस एका विशिष्ट समाजाच्या मुलांसोबत जाताना काहींनी पाहिले.त्यानुसार लोकांनी शोध सुरू केला असता जवळीलच गावातील हॉटेलमध्ये ते मुक्कामास असल्याचे गावातील लोकांच्या निदर्शनास आले. हा लव जिहादचा प्रकार असल्याने गावातील वातावरण तापले. गावात ग्रामसभा घेण्यात आली. गावातील अतिक्रमणे काढण्याबरोबरच गावात काही नवीन विशिष्ट समाजाच्या लोकांची संख्या काही दिवसात वाढत असून अनेक बाहेरचे लोक या ठिकाणी स्थायिक झाल्याचे गावकरी सांगतात. हे लोक कोठून आले, त्याचे आधार कार्ड, त्यांचे मूळ ठिकाण शोधण्यात यावे व या लोकांना गावातून बाहेर काढण्यात यावे, गावातील अतिक्रमणे तातडीने काढण्यात यावीत, असे ठराव करण्यात आले. दरम्यान आ. जगताप यांनी या ठिकाणी भेट दिली. ज्या कुटुंबातील महिला होती त्या पीडित कुटुंबातील लोकांना पोलिस संरक्षण मिळावे, तसेच गावातील अतिक्रमणे तातडीने काढण्यात यावीत, यासाठी आपणही प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले. दरम्यान बेपत्ता महिलेचा शोध घेण्यास एमआयडीसी पोलिसांना रविवारी यश आले. अकोले येथून महिलेला ताब्यात घेतले. अकोले पोलिसांच्या मदतीने एमआयडीसी पोलिसांनी महिलेचा शोध घेतला. पीडित महिलेने फिर्याद दिल्यास या प्रकरणी गुन्हा दाखल केला जाईल, असे एमआयडीसी पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक माणिक चौधरी यांनी सांगितले.

## पान १ वरुन

### संत तुकाराम महाराज यांच्या नामगजराने देहूनगरी दुमदुमली

वैकुंठगमन झाले. त्यामुळे हा दिवस तुकाराम बीज म्हणून ओळखला जातो. यंदाचा तुकाराम महाराजांचा त्रिशतकोत्तर अमृतमहोत्सवी वैकुंठगमन सोहळा लाखो भाविकांच्या उपस्थितीत उत्साहात साजरा झाला. देहूनगरीत या दिव्य सोहळ्यासाठी राज्याच्या कानाकोपऱ्यातून लाखो वारकरी दाखल झाले होते. पहाटे चार वाजता मुख्य देऊळवाड्यात काकडारती झाली. पहाटे साडे पाच वाजता देऊळवाड्यातील विठ्ठल-रुक्मिणी पूजा, संत तुकाराम महाराज शिळा मंदिरातील महापूजा आणि वैकुंठगमन स्थान येथील पूजा संस्थानाचे अध्यक्ष पुरुषोत्तम महाराज मोरे आणि विश्वस्त यांच्या हस्ते झाल्या. प्रांत अधिकारी यशवंत माने, तहसीलदार जयराज देशमुख, वैद्यकीय अधिकारी डॉ. किशोर यादव, विश्वस्त माणिक महाराज मोरे, संजय महाराज मोरे, भानुदास महाराज मोरे, संतोष महाराज मोरे, अजित महाराज मोरे, विशाल महाराज मोरे यावेळी उपस्थित होते.

सकाळी दहा वाजता हरीनामच्या गजरात पालखीचे वैकुंठस्थान मंदिराकडे प्रस्थान झाले. त्यानंतर वैकुंठगमन सोहळ्यात बापूसाहेब देहूकर महाराजांचे वैकुंठगमन प्रसंगावर कीर्तन झाले. 'घोंटविन लाळ ब्रह्मज्ञान्याहाती' यावर आधारित कीर्तन झाले. फडकरी, वारकरी, मानकरी यांचा सत्कार झाला. साडे अकरा वाजता पालखीची वैकुंठगमन मंदिराला प्रदक्षिणा झाली. दुपारी बारापर्यंत तुकोबारायांच्या नामाचा, विठ्ठलाच्या नामाचा गजर झाला. बारा वाजता नांदुरकीच्या वृक्षावर फुलांची उधळण करून, मनोभावे हात जोडत भाविकांनी इंद्रायणीच्या काठी भक्तिचैतन्य फुलविले. दुपारी साडेबारा वाजता वैकुंठस्थान येथून पालखीचे मुख्य देऊळवाड्यातील मंदिराकडे आगमन झाले. हा सोहळा पाहण्यासाठी भाविकांची अलोट गर्दी झाली होती. अडीच लाखांहून अधिक भाविक बीज सोहळ्याला उपस्थित होते.

**कडेकोट पोलीस बंदोबस्त**

मंदिर परिसराच्या दोन्ही बाजूंना फेरीवाले, पथारीवाले यांना प्रतिबंध करण्यात आला होता. मंदिर आवारात त्रिस्तरीय सुरक्षाव्यवस्था तैनात होती. कडेकोट पोलीस बंदोबस्त होता. देहूत प्रवेश करणाऱ्या मार्गावर सुरक्षा कठडे लावले होते. गावात वाहनांना प्रवेश बंद केला होता.

### भाजपचे उमेदवार जाहीर

सहाय्यक सुमित वानखेडे यांना उमदेवारी देण्यात आली. त्यामुळे नाराज केचे हे बंडखोरीच्या पवित्र्यात होते. मात्र, त्यावेळी विधानपरिषदेची उमेदवारी देण्याचे आश्वासन मिळाल्यानंतर केचे शांत झाले. तिसरे उमेदवार संजय केनेकर हे भाजपचे प्रदेश सरचिटणीस असून, छत्रपती संभाजीनगरमधील भाजपचा प्रमुख चेहरा म्हणून त्यांनी ओळख निर्माण केली आहे. भाजपसाठी बुथपातळीपासून काम केलेल्या केनेकर यांना पक्षाने विधानपरिषदेवर संधी दिली आहे. दरम्यान, भाजपच्या तीनही उमेदवारांना विधानपरिषदेचा जेमतेम वर्षभराचा कालावधी मिळणार आहे. कारण प्रवीण दटके, रमेश कराड आणि गोपीचंद पडळकर यांचा विधान परिषदेतील कार्यकाळ १३ मे २०२६ रोजी संपणार होता. आता होऊ घातलेली पोटनिवडणूक ही या उर्वरित कालावधीसाठीच आहे. त्यामुळे भाजप उमेदवारांचा आमदारकीचा कालावधी हा फारतर १३ महिने आणि ९ दिवस इतकाच असेल.

दरम्यान, विधानपरिषद पोटनिवडणुकीत निवडून येणाऱ्या राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार यांच्या पक्षाच्या उमेदवाराची मुदत २७ जुलै २०३० तर शिवसेना एकनाथ शिंदे गटाच्या उमेदवाराची मुदत ७ जुलै २०२८ अशी आहे.

### श्रीरामपूर : १५ वाळूतस्करांवर धडक कारवाई

गुन्हे दाखल करण्यात आले असून त्यांच्याकडून ३५ लाख १० हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे तर शेवगाव पोलीस ठाण्यात दोन आरोपींविरुध्द बीएनएस ३०३ (२) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यांच्याकडून ५ लाख १० हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदर कारवाई जिल्हा पोलीस अधिक्षक राकेश ओला, अप्पर पोलीस अधिक्षक वैभव कलुबर्मे, प्रशांत खैरे, उपविभागीय पोलीस अधिकारी बसवराज शिवपुजे, उपविभागीय पोलीस अधिकारी शेवगाव विभाग सुनील पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी केली आहे.

### बिबट्यांना शोधण्यासाठी ड्रोनचा वापर करा

विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

मंत्री विखे पाटील म्हणाले, उन्हाळ्यात पाण्याचे योग्य नियोजन करावे लागेल. पाण्याची मागणी वाढणार असल्याने नियोजनात कोणत्याही चुका होणार नाहीत याची दक्षता घ्यावी. सर्व विभागांनी एकत्रितपणे यासाठी काम करावे. रोजचा अहवाल जिल्हाधिकारी कार्यालयाच्या वॉर रुमला येईल याची खबरदारी घ्यावी. मानवी वस्तीत बिबट्यांच्या वाढत्या संचाराचे मोठे आव्हान असून पिंजरे लावूनही बिबटे सापडत नाही. यासाठी ड्रोनचा अधिक वापर करावा. दुपारी दोन वाजेपासून पालकमंत्र्यांनी नागरिकांच्या भेटी घेण्यास प्रारंभ केला. प्रत्येक नागरिकाचा अर्ज स्वीकारून त्यांच्या समस्या त्यांनी जाणून घेतल्या. व्यक्तिगत संवादातून त्यांनी नागरिकांच्या समस्यांचे यशस्वीपणे निराकरण केले.

अहिल्यानगर महानगरपालिका, परिवहन, भूमी अभिलेख, जलसंपदा, महावितरण या विभागाच्या संदर्भातील अर्ज जनता दरबारात प्राप्त झाले. प्राप्त झालेल्या सर्व अर्जावर गांभीर्याने कार्यवाही करून पालकमंत्री कार्यालयास आणि संबंधित अर्जदारास केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करण्याच्या सूचनाही पालकमंत्र्यांनी यावेळी दिल्या.

### जय पवार लवकरच लग्न बंधनात अडकणार

त्यांनी शरद पवार यांच्या पत्नी प्रतिभा पवार यांचीदेखील भेट घेतली. पवार कुटुंबियांच्या या भेटीचे फोटो सुप्रिया सुळे यांनी सोशल मीडियावर शेअर केले. या फोटोंवर विविध प्रकारच्या कमेंट येत आहेत. तसंच या लग्न सोहळ्यामुळे शरद पवार आणि अजित पवार एकत्र येतील का? या चर्चाही सुरु झाल्या आहेत. ऋतुजा पाटील आणि जय पवार यांची काही वर्षांपासूनची ओळख आहे असंही समजतं आहे. या दोघांनी शरद पवार आणि प्रतिभाताई पवार यांची १३ मार्चला भेट घेतली. पवार कुटुंबातल्या महिलांनी या दोघांचे औक्षण केल्याचे फोटो सोशल मीडियावर सुप्रिया सुळेंनी पोस्ट केले आहेत.

**अजित पवारांची होणार सून ऋतुजा पाटील कोण आहेत?**

अजित पवारांचे धाकटे चिरंजीव जय पवार यांचं लग्न ऋतुजा पाटीलशी होणार आहे. त्या फलटण येथील प्रवीण पाटील यांच्या कन्या आहेत. प्रवीण पाटील हे सोशल मीडिया कंपनी सांभाळतात. ऋतुजा पाटील या उच्चशिक्षित आहेत. मागच्या काही वर्षांपासून ऋतुजा पाटील आणि जय पवार यांची ओळख आहे. ऋतुजा पाटील यांची बहीण केसरी ट्रॅव्हल्सच्या केसरी पाटील यांची सून आहेत.

### रेडी रेकनरसाठी व्हॅल्यू झोन तयार करणार

शेजारी होणाऱ्या म्हाडा आणि एसआरएच्या प्रकल्पांनाही एकच दर लावण्यात येतो. त्यामुळे घर घेणे सर्वसामान्यांच्या अवाक्याबाहेर गेले असे सदस्यांचे म्हणणे असेल तर आपल्या तक्रारीची योग्य दखल शासनाने घेतलेली आहे.

### आम्ही शांततेसाठी प्रयत्न केले, पण पाककडून प्रत्येकवेळी विश्वासघात

रशिया सातत्याने युक्रेनवर हल्ले करत आहे, यात युक्रेनची अनेक शहरे उद्ध्वस्त होत आहेत. युक्रेन-रशियातील हा संघर्ष थांबण्यासाठी काही दिवसांपासून अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प हे देखील मध्यस्थी करत असल्याचं पाहायला मिळालं. डोनाल्ड ट्रम्प यांच्या युद्धबंदी प्रस्तावावर व्लादिमीर पुतिन हे देखील सहमत असल्याचं समोर आलं. मात्र, युद्धबंदी प्रस्तावानंतर युक्रेनसाठी काही अटी शर्थींची मागणी व्लादिमीर पुतिन यांनी केली. त्यावर युक्रेनचे अध्यक्ष झेलेन्स्की यांनी पुन्हा टीका केली होती.

दरम्यान, आता भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रशिया आणि युक्रेनच्या संघर्षावर मोठं भाष्य केलं आहे, तसेच रशिया आणि युक्रेन या दोन्ही देशांना एक मोलाचा सल्लाही दिला आहे. ही वेळ युद्धाची नाही, असं म्हणत मोदींनी पुतिन आणि झेलेन्स्की यांना सल्ला दिला. रशिया आणि युक्रेन हे दोन्ही देश मित्र राष्ट्र आहेत. रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांच्याबरोबर बसून मी त्यांना म्हणू शकतो की ही युद्धाची वेळ नाही. तसेच युक्रेनचे अध्यक्ष झेलेन्स्की यांनाही मी मैत्रीपूर्ण पद्धतीने सांगू शकतो की भाऊ, जगात कितीही लोक तुमच्याबरोबर उभे असले तरी युद्धभूमीवर कधीही तोडगा निघणार नाही, असं म्हणत रशिया आणि युक्रेन संघर्ष केवळ चर्चेनेच संपेल हे भारताने अनेक वेळा स्पष्ट केलं असल्याचं मोदींनी म्हटलं आहे. युक्रेन मित्र राष्ट्रांसोबत असंख्य वेळा चर्चा करू शकेल. मात्र, त्याचे कोणतेही फळ मिळणार नाही. चर्चांमध्ये दोन्ही देशांचा समावेश असला पाहिजे. यावर तोडगा फक्त वाटाघाटींच्या माध्यमातून काढता येईल, युद्धभूमीवर नाही. युद्धामुळे संपूर्ण जगाला त्रास सहन करावा लागला आहे. मी यामध्ये कुठेही तटस्थ नाही, तर मी शांततेच्या बाजूने आहे, असंही मोदींनी म्हटलं आहे.

### ८३ दिवसांत गाळप हंगाम आटोपला

उसाची अवस्था आणि त्यातून होणाऱ्या अपेक्षित घटत्या साखर साखर उत्पादनाची आकडेवारी सर्व प्रमुख आंतरराष्ट्रीय संशोधन संस्थांनी व्यक्त केली होती.

उत्तर प्रदेशातील बहुसंख्य ऊस क्षेत्र व्यापलेल्या को-०२३८ या उसावर रेड रॉट आणि टॉप शूट बोररचे आक्रमण झालेले आणि त्याचवेळी महाराष्ट्र आणि कर्नाटक राज्यातील उभ्या उसावर आलेला अकाली फुलोरा व त्यामुळे खुंटलेली वाढ व साखर उताऱ्यावरील प्रतिकूल परिणाम या सर्व बाबी प्रकर्षाने समोर आलेल्या होत्या. महाराष्ट्रातील निवडणुकांमुळे नवा गाळप हंगाम १५ नोव्हेंबर २०२४ नंतर सुरु झाला आणि कर्नाटक शासनाने देखील १५ नोव्हेंबरचे फर्मान जारी केले. या दोन्ही राज्यातील ऊस गाळप जर १५ ऑक्टोबरला सुरु झाले असते तर या पेक्षा भयानक परिस्थिती समोर आली असती.

महाराष्ट्र आणि कर्नाटक राज्यांसह उत्तर प्रदेशाचा अपवाद वगळता संपूर्ण देशाचा गाळप हंगाम मार्च अखेरपर्यंतच चालेल आणि उत्तर प्रदेशातील धुराडी एप्रिलमध्यापर्यंत बंद होतील असा अंदाज राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील यांनी व्यक्त केला आहे. तसेच कमी झालेल्या गाळप हंगामाचा विपरित आर्थिक परिणाम सर्व कारखान्यांवर होणार असल्याची चिंता देखील त्यांनी व्यक्त केली. विशेषतः २०० साखर कारखाने असणाऱ्या महाराष्ट्रासारख्या प्रगल्भ राज्यातील साखर उद्योगाचा यंदाचा गाळप हंगाम सरासरी फक्त ८३ दिवस इतकाच चालला आहे. कोणताही कारखाना किमान १४० ते १५० दिवस चालला, तरच त्याचे अर्थकारण टिकत असते. यंदा ८३ दिवसाचा हंगाम आणि त्यातून केवळ ८० लाख टन नवे साखर उत्पादन यामुळे महाराष्ट्रातील संपूर्ण साखर उद्योग यंदाच्या वर्षी प्रचंड आर्थिक अडचणीत सापडलेला आहे. ३६५ दिवसांच्या खर्चाचा डोंगर आणि ८३ दिवसांचा हंगाम याचे गणित बसविणे महाकठीण असल्याची चिंता हर्षवर्धन पाटील यांनी व्यक्त केली आहे.

राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाचे व्यवस्थापकीय संचालक प्रकाश नाईकनवरे यांच्या मते यंदाच्या कडवट हंगामाच्या पार्श्वभूमीवर ऑक्टोबरपासून सुरु होणाऱ्या नव्या साखर हंगामाबाबत आशावाद आहे. २०२४ मधील समाधानकारक पर्जन्यवृष्टीमुळे उसाच्या नव्या लागणी मोठ्या प्रमाणावर झाल्या आहेत. तसेच प्रमुख जलाशयातील पाण्याच्या साठ्यांमुळे यंदा तुटला गेलेला उसाचा खोडवा पुढील गाळप हंगामाच्या उत्तरार्धात उपलब्ध होईल. त्यातच ऑस्ट्रेलिया, युरोप, अमेरिका आणि त्या पाठोपाठ भारतीय हवामान खात्याने यंदाचे भारतातील पाऊसमान समाधानकारक असण्याचा अंदाज व्यक्त केला आहे. त्या प्रमाणे घडल्यास उभ्या उसाच्या वाढीला आणि साखर उत्पादनाला चालना मिळेल असा आशावाद त्यांनी व्यक्त केला आहे.

### वारकरी सांप्रदायाबद्दलचा आदर वृद्धिंगत झाला

मोरे, संजय महाराज मोरे, खासदार श्रीरंग बारणे, आमदार विजय शिवतारे, शरद सोनवणे, शिवसेनेच्या उपनेत्या सुलभा उबाळे, सारिका शेळके आदी उपस्थित होते.

शिंदे म्हणाले, हा पुरस्कार एकट्याचा नाही. माझ्यावर, माझ्या कामावरप्रेम करणाऱ्या, वारकरी, धारकरी, शेतकरी, लाडकी बहिणी, लाडक्या भावांचा सर्वांचा पुरस्कार आहे. पुरस्कार मिळाल्याने माझी जबाबदारी वाढली आहे.समाजाची सेवा अधिक जोरकसपणे करण्याची प्रेरणा यातून मिळाली आहे.

शिंदे पुढे म्हणाले वारकऱ्यांची सेवा करण्याची संधी पुरस्काराने मिळाली आहे. त्यामुळे मी स्वतःला भाग्यवान समजतो. छत्रपती शिवाजी महाराज आणि संत तुकाराम महाराज यांची भेट झालेली ही पवित्र भूमी आहे. या पवित्र भूमीत हा पुरस्कार मिळतोय यापेक्षा दुसरे भाग्य नाही. पुरस्कार दिल्याबद्दल देहू देवस्थानचे मनापासून आभार मानतो.